**शैक्षणिक संदर्भ अंक १२८ फेब्रुवारी-मार्च २०२१**

महा इतिहास - भाग १०

# वेगळी वाट

**लेखक: प्रियदर्शिनी कर्वे**

## महा इतिहास - भाग १०

# वेगळी वाट


**लेखक: प्रियदर्शिनी कर्वे**

*साधारण अडीच ते दोन लाख वर्षांपूर्वी आपली प्रजाती उत्क्रांत झाली असे मानववंशशास्त्रीय आणि जनुकीय पुराव्यांवरून दिसते. पण इतर कोणत्याही प्राणी प्रजातीपेक्षा, अगदी जनुकीयदृष्ट्या आपल्या सर्वात जवळ असलेल्या चिंपांझींपेक्षाही, आपला पृथ्वीवरचा प्रवास वेगळा आहे. हे नेमके कसे झाले, आणि त्या सुरुवातीच्या काळातील घडामोडींमध्ये आजच्या मानवी जगाची पाळेमुळे कशी रुजलेली आहेत, ते पाहूया या लेखात.*

माणसांच्या वर्तनात व जीवनव्यवहारात इतर कळपात रहाणाऱ्या प्राण्यांच्या तुलनेत वेगळेपण नेमके कधी आले, यावर अजूनही संशोधकांचे एकमत झालेले नाही. जनुकीय अभ्यास आपल्या मेंदूचा मोठा आकार, आपले दोन पायांवर चालणे, आपला हाताच्या अंगठ्याचा वापर करण्याची क्षमता या सुरुवातीपासून असलेल्या वेगळेपणांकडे बोट दाखवतो, पण याचे प्रतिबिंब आपल्या वेगळ्या वर्तनात नेमके कधीपासून पडू लागले, या संदर्भात पुराव्यांची कमतरता ही एक मोठी अडचण आहे.

सध्या उपलब्ध पुराव्यांनुसार किमान एक लाख वर्षांपूर्वी आपण जगण्याचा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा मार्ग चोखाळायला सुरूवात केली असावी, असे साधारणतः दिसते. वेगवेगळ्या कालखंडात मानवी प्रजातींच्या टोळ्या आफ्रिका खंडाबाहेर पडल्या, आणि

इतर भूभागांत पसरल्या. पण होमो सेपियन ह्या आपल्या प्रजातीने सारे जग व्यापून टाकले. सुमारे नव्वद हजार वर्षांपूर्वीपासून ते अगदी काही हजार वर्षांपूर्वीपर्यंत होमो सेपियन माणसांची ही भटकंती सुरू होती. साधारण पन्नास हजार वर्षांपूर्वीपासूनचे मानवी जीवनव्यवहारांचे वेगळेपण दाखवणारे मुबलक पुरावे जगात सर्वत्र सापडतात, पण त्यापूर्वीचे फारसे पुरावे सापडलेले नाहीत.




***माणसांच्या वेगवेगळ्या प्रजातींचे आफ्रिकेबाहेर संक्रमण. यातील आकडे साधारण किती वर्षांपूर्वी होमो सेपियन माणसे जगाच्या विविध भागांत पोहचली असावीत हे दर्शवतात. (स्रोत – विकीपिडिया)***

यात विशेष नमूद करण्याची एक बाब म्हणजे सुमारे एक लाख दहा हजार वर्षांपूर्वीपासून ते दहा हजार वर्षांपूर्वीपर्यंत पृथ्वीवर हिमयुग चालू होते. यामुळेच होमो सेपियन माणसांना चालत एका खंडातून दुसऱ्या खंडात जाणे शक्य झाले. कारण बहुतांश पाणी गोठलेल्या स्वरूपात असल्याने समुद्रांची पातळी कमी झालेली होती आणि विविध भूभाग जोडणारे नैसर्गिक पूल तयार झालेले होते. पण या हिमयुगाच्या खडतर वातावरणाशी आणि बऱ्याच ठिकाणी असलेल्या अन्न-पाण्याच्या कमतरतेशी जुळवून घेत या प्रजातीने सारे जग पादाक्रांत केले, हे विशेष.

अर्थात या इतिहासामध्ये आणखीही काही विचार करण्यासारख्या गोष्टी आहेत. वानर कुलात ओरांग उटांग, गोरिला, चिंपांझी, बोनोबो आणि इतर अनेक प्रजाती आहेत. पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागात तिथल्या भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेतलेल्या एकापेक्षा जास्त वानर प्रजाती सापडतात. मानव कुलातही इतिहासात अनेक प्रजाती होत्या, याचे भरपूर पुरावे सापडलेले आहेत. होमो सेपियन माणसांपूर्वी आफ्रिकेतून बाहेर पडलेल्या मानव प्रजाती जगाच्या इतर भागांमध्ये वसलेल्या होत्या. पण सेपियन या आपल्या प्रजातीचे आगमन झाल्यानंतर मात्र मानव कुलातील इतर प्रजाती गायब झालेल्या दिसतात. नियँडरथॉल मानवाच्या बाबतीत तर सेपियन मानवांबरोबरच्या संघर्षामुळेच ही प्रजाती नष्ट झाल्याचे थेट पुरावेच आहेत. आज मानवाच्या हस्तक्षेपामुळे संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. म्हणजे इतरांबरोबर जुळवून घेण्याची क्षमता उपजतच सेपियन मानवांमध्ये कमी आहे का? मानवाच्या पृथ्वीवरील साम्राज्याचा पाया आपल्याच भाउबंदांच्या रक्ताने लांछित आहे का? तसे असेल तर मानवता, मानवी मूल्ये, इ.च्या बाता आपण कशाच्या जोरावर मारतो?

होमो सेपियन मानवाने आफ्रिकेतून बाहेर पडून संपूर्ण पृथ्वीवर वसाहती केल्याच्या या साऱ्या कालखंडाला अश्मयुग किंवा पेलिओलिथिक इरा असे म्हणतात. अर्थातच दगडांची हत्यारे वापरण्याचे तंत्रज्ञान या कालखंडात प्रचलित होते. या काळात मानवी जीवन कसे होते, याबद्दल काही अंदाज बांधता येतात.



***इजिप्तमध्ये सापडलेले दगडी हत्यार(स्रोत – PICRYL)***

माणसे आपल्याला लागणारे अन्न आपल्या आजूबाजूच्या निसर्गातून धुंडाळून मिळवत होती. अर्थात इतरही अनेक प्राणी शिकार इ. करून आपले पोट भरतात, आणि

काही प्राणी तर टोळीने नियोजनबध्दरित्या अन्नाचा शोध आणि वेधही घेतात. पण माणसांचे अन्न धुंडाळणे या साऱ्यापेक्षा वेगळे होते, याचे कारण म्हणजे सामूहिक ज्ञान निर्मितीची माणसांची क्षमता.

इतर कोणत्याही प्राणी प्रजातीत न आढळणारे माणसांचे वैशिष्ट म्हणजे भाषा विकसन आणि भाषेचा वापर करून माहितीची देवाणघेवाण करता येणे. यामुळे कोणत्या ठिकाणी कोणत्या मोसमात अन्न मिळवण्याच्या काय संधी आहेत, काय धोके आहेत, याची माहिती एका समूहातील सर्वांना असू शकते, इतकेच नाही तर प्रत्येक पिढी ही माहिती पुढच्या पिढीपर्यंत पोहचवत असल्याने, अतिशय मोठा असा मार्गदर्शक ज्ञानाचा साठा काळाबरोबर तयार होत जातो. जी गोष्ट निरीक्षणातून मिळालेल्या परिसराबद्दलच्या ज्ञानाची तीच तंत्रज्ञान निर्मितीची, त्यातील सुधारणांची, नवनव्या संकल्पनांची, तसेच करमणुकीच्या गोष्टी आणि कलांमधील कौशल्याचीही. दुसऱ्या कोणत्याही प्रजातीकडे नाही, असा हा अनुभवाधिष्ठित उपयोजित आणि सैध्दांतिक ज्ञानाचा सतत वाढणारा साठा असल्यामुळे टोळीतील माणसांचे परस्परसहकार्यही अधिक नेमके, व्यापक आणि बहुआयामी बनत गेले.

या संपूर्ण कालखंडात माणसांच्या टोळ्या भटके जीवन जगत होत्या. अशा जीवन पध्दतीत यशस्वीपणे तग धरण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात.

एकतर टोळीचा आकार लहान असावा लागतो, म्हणजेच लोकसंख्या मर्यादित असावी लागते. यासाठी लोक कुटुंबनियोजनाच्या काही नैसर्गिक साधनांचा वापर करत होते, त्याचप्रमाणे अर्भकांची आणि वृध्दांची फार काळजी न घेणे (ज्यायोगे दुर्बळ जीव आपोआप मरून जातील), काहीवेळा गैरसोय होत असेल तर त्यांची हत्याही करणे, असे पर्याय सर्रास वापरले जात होते. यामुळे या कालखंडात लोकसंख्या वाढीचा दर अत्यंत कमी होता.

भटक्या मानवांचे खाणे हे मुख्यतः निसर्गातून गोळा करून आणलेल्या वनस्पती, कंद, बिया, फळे, अळिंबी, छोटे प्राणी, कीटक, इ. यांमधून येत होते. क्वचित कधी त्याला मोठ्या प्राण्यांच्या मांसाची जोड मिळे. हे मांस कधी इतर भक्षकांनी मारलेल्या कलेवरांवर डल्ला मारून मिळवले जाई, तर कधी सामूहिक शिकार करून. सर्वसाधारणतः शिकारींचे पुरावे हे हाडांच्या रूपाने मागे शिल्लक रहातात, याउलट निसर्गातून गोळा करून आणलेले मुख्यतः वनस्पतीजन्य पदार्थ मागे अवशेष सोडत नाहीत. त्यामुळे भटका मानव प्रामुख्याने शिकारी होता, असा एक गैरसमज पसरलेला आहे. पण अनेक ठिकाणांहून मिळालेले पुरावे, तसेच आजही भटके जीवन जगणाऱ्या मानवसमूहांच्या अभ्यासातून आता संशोधक या निष्कर्षाला पोहचले आहेत, की स्वतः शिकार करून अन्न मिळवणे ही माणसांसाठी दुर्मिळ बाब होती. मुळात शिकारीचा प्रयत्नही कमी वेळा व्हायचा, आणि त्यात यश येण्याचे प्रमाण त्याहून कमी होते.

अशा पध्दतीने हजारो वर्षे एखाद्या भूभागात तग धरून रहाण्यासाठी आपल्या परिसराची खडा न खडा माहिती असणे आवश्यक आहे. आत्ता मागे वळून पहाताना या भटक्या माणसांची हत्यारे अगदी साधी सोपी वाटली, तरीही याच हत्यारांनी अत्यंत खडतर परिस्थितीत त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवले, हे विसरून चालणार नाही. विशेषतः हिमयुगाच्या कालखंडात ध्रुवीय प्रदेशात तग धरून वसाहती केलेल्या माणसांचे विशेष कौतुक करायला हवे. दगडधोंडे, मोठ्या प्राण्यांची हाडे, सुळे, शिंगे, कातडी, इ.चा अत्यंत कल्पकतेने वापर करत या टोळ्या इथल्या आव्हानात्मक परिस्थितीत टिकून राहिल्या.

आपल्या भटक्या पूर्वजांबद्दलचा आणखी एक सार्वत्रिक गैरसमज म्हणजे पुरुष शिकारी करत, आणि स्त्रिया परिसरातून अन्नपदार्थ गोळा करून आणत. पण पुरातत्त्वीय पुरावे

आणि आजही भटके जीवन जगणाऱ्या समूहांच्या अभ्यासातून असे दिसते, की गोळा करण्याचे काम कोणी करायचे आणि शिकारीला कोणी जायचे, हे त्या त्या व्यक्तीमधील अंगभूत कौशल्ये, त्या वेळच्या समूहाच्या वेगवेगळया गरजा आणि स्त्रियांच्या गर्भधारणेच्या चक्रावरून ठरत होते. केवळ स्त्रिया आणि मुले असे समूहही कोणत्याही पुरुषांच्या मदतीशिवाय तग धरून राहू शकत होते. त्यामुळे आज आपण वेगवेगळया प्रकारच्या कामांची जी लिंगाधारित विभागणी मानतो, त्या कल्पनेचा उगम या भटकेपणाच्या नंतरच्या कालखंडात झालेला आहे, हे स्पष्ट आहे.

भटक्या लोकांचे जगणे आजच्या माणसापेक्षा अधिक आरोग्यदायी आणि आनंदी होते, असे दिसते. त्यांचा आहार चौरस आणि वैविध्यपूर्ण होता. एखाद्या ठिकाणी उपासमार होऊ लागली, तर माणसे सरळ उठून अधिक समृध्द परिसराकडे चालू पडत होती. भुके मरू पण इथेच राहू, अशी त्यांची वृत्ती नव्हती, जमिनीशी बांधून ठेवणारी कोणतीही गुंतवणूक ती करत नव्हती. फिरतीचे आणि अंगमेहनतीचे जगणे तसेच पुरेसा आणि संतुलित आहार असल्याने जी बालके जगत होती, ती सुदृढ प्रौढ बनत होती. आपली त्या दिवसाची पोटापाण्याची गरज एकदा भागवली, की त्यांच्याकडे भरपूर रिकामा वेळ होता. हा वेळ कुटुंबासोबत, मित्रमैत्रिणींसोबत घालवला जात होता.

पण हे जगणे जोखमीचेही होते. निसर्गातून अन्न मिळण्याच्या धडपडीत अनोळखी प्रदेशात खाचखळग्यांचा, विषारी जीवांचा तसेच आपल्याला भक्ष्य बनवू शकणाऱ्या प्राण्यांचा सामना होत होता. जखमा किंवा बारीकसारीक आजारांमुळेही आयुष्य संपण्याचा धोका निर्माण होत होता. त्यामुळे भटक्या मानवांचे सरासरी आयुर्मान ३० वर्षांच्या आसपास असावे असे दिसते.

भटक्या माणसांच्या टोळयांमध्ये साधारण १० ते २० लोक असत. ते एकमेकांशी कौटुंबिक नातेसंबंधांनी जोडलेले असत. एकाच परिसरात फिरणाऱ्या टोळयाही एकमेकांशी नातेसंबंधांनी आणि मैत्रीच्या धाग्यांनी जोडलेल्या असत. अधूनमधून या टोळया काही दिवसांसाठी एकत्र येत. हे दिवस उत्सवाचे, गप्पांचे, माहितीच्या, कौशल्यांच्या आणि भेटवस्तूंच्या देवाणघेवाणीचे, तसेच लग्ने व मैत्र्या जमवण्याचेही असत.

भटक्या लोकांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व श्रध्दा काय असाव्यात, याबाबत बरेच विचारमंथन केले गेलेले आहे. त्यांनी मागे ठेवलेली चित्रे, कर्मकांडांच्या खाणाखुणा, आदिवासी समाजांमध्ये पूर्वापार चालत आलेल्या रूढी, लोककथा, इ. वरून काही ठोकताळे बांधता येतात. सर्वसाधारणतः भटकी माणसे स्वतःला आजूबाजूच्या निसर्गाचा एक घटक मानत होती. आपले स्थान इतर घटकांपेक्षा वेगळे आहे, असे त्यांना वाटत नव्हते. त्यामुळे आपल्या उपयोगी पडणाऱ्या इतर घटकांबाबत त्यांची भावना ही मालकी हक्काची नाही, तर आदराची आणि कृतज्ञतेची होती. आपल्या भटकंतीच्या परिघातील गोष्टींच्या बाहेरील बाबींची (उदा. सूर्य, चंद्र, तारे, इ.) ही माणसे नोंद घेत होती, पण त्यांबद्दल त्यांना फारसे देणेघेणे नव्हते. त्यामुळे त्यांना पूजनीय असणाऱ्या देवताही कोणत्याही आकाशस्थ स्वर्गातल्या नव्हत्या, तर त्यांच्या परिसरातील महत्त्वाच्या घटकांशी (उदा. वृक्ष, नदी, डोंगर, वाघ, इ.) जोडलेल्या होत्या.



***स्पेनमधील अल्टामिरा गुहेतील अश्मयुगीन चित्र (स्रोत – विकीपिडिया)***

भटक्या माणसांचे जगणे पूर्णतः निसर्गस्नेही होते, हा आणखी एक गोड गैरसमज आहे. माणसे आफ्रिकेतून बाहेर पडली त्यावेळी एकूण लोकसंख्या काही हजार असावी. हिमयुग संपले तेव्हा साधारण पन्नास लाख ते एक कोटी माणसे सर्व जगभरात मिळून होती, असा अंदाज आहे. इतक्या कमी लोकसंख्येच्या आणि सर्वत्र विखुरलेल्या या माणसांमुळेही काही भूभागांमधील निसर्गाचे रूप कायमस्वरूपी बदलले, तर काही प्राणी नामशेष झाले. उदा. ऑस्ट्रेलियातील आदिवासी मोठ्या परिसराला मुद्दाम आग लावून देत असत. यामुळे प्राण्यांची पळापळ होऊन मुबलक शिकार हाती लागत असे. जळून गेलेल्या परिसरात नव्याने उगवण झाली, की त्यातूनही खाण्यायोग्य मुबलक गोष्टी गोळा करून आणता येत असत. पण वारंवार लावलेल्या आगींमुळे त्या परिसंस्थेचे स्वरूप कायमचे बदलले. उत्तर अमेरिकेतील हिमाच्छादित भागात वावरणाऱ्या वूली मॅमथ ह्या हत्तीसदृश प्राण्याची प्रजाती भटक्या माणसांनी केलेल्या शिकारीमुळे पूर्णपणे नष्ट झाली. भटक्या जीवनातही मानवांनी केलेल्या निसर्गाच्या ऱ्हासाची अशी अनेक उदाहरणे आहेत.



***वूली मॅमथचे कल्पनाचित्र***
***(स्रोत – विकीपिडिया)***

साधारण बारा हजार वर्षांपूर्वी हिमयुग संपायला सुरूवात झाली, आणि वेगवेगळया भूभागांवर वसलेल्या माणसांना आपापल्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे भाग पडले. या प्रक्रियेचाच एक भाग म्हणजे साधारण दहा-अकरा हजार वर्षांपूर्वी काही ठिकाणी शेती आणि पशुपालनावर आधारित नवी जीवनशैली आकार घेऊ लागली. पुढच्या हजारेक वर्षांत हळूहळू ही जीवनशैली सर्व जगभर पसरली. हे नेमके कसे घडले असावे, यावरही बरीच मतमतांतरे आहेत. पण साधारण या कालखंडापासून जगातील विविध मानवीसमूहांचा

इतिहास स्थानिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या मार्गांनी पुढे गेलेला दिसतो. इथून पुढचा महा इतिहास हा आपण काहीसा जग आणि भारत अशा परिप्रेक्षात पहाणार आहोत. याची सुरूवात म्हणून आपल्या कहाणीत पुढे जाण्यापूर्वी पुढच्या लेखात आपण भारतीय उपखंडातील भौगोलिक, जैविक व मानवी घडामोडींचा साधारण दहा हजार वर्षांपूर्वीपर्यंतचा महा इतिहास थोडक्यात पाहूया.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी – बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: होमो सेपियन, आफ्रिकेतून बाहेर संक्रमण, अश्मयुग, पेलिओलिथिक इरा, हिमयुग, भटके जीवन, सामूहिक ज्ञाननिर्मिती, दगडी हत्यारे, वूली मॅमथ)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***